# मुंबईसाठी मेट्रो आवश्यक

## प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना उच्च न्यायालयाने फटकारले



मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी) - पर्यावरणाच्या नावाखाली विरोधासाठी विरोध नको वस्तुस्थिती विचारात घेऊन व्यावहारिक दृष्टीकोन ठेवा, मुंबईतील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी मेट्रो आवश्यक आहे. आम्हाला ही समस्या सोडवायची आहे, वाढवायची नाही, अशा शब्दात उच्च न्यायालयाने गुरुवारी कुलाबा-सीप्झ मेट्रो प्रकल्पाला विरोध करणाऱ्या स्थानिक रहिवाशी व पर्यावरण प्रेमी कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले.

वांद्रे-कुर्ला संकुल स्थानकासाठी खारफुटीची झाडे तोडण्यास परवानगी मिळावी म्हणून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने(एमएमआरसीएल) उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका सादर केली आहे. त्या याचिकेवर न्यायमूर्ती व्ही. एम. कानडे आणि न्यायमूर्ती ए.एम. बदर यांच्या खंडपीठासमोर झाली. यावेळी पर्यावरणप्रेमी संघटनांच्या वकिलानी जोरदार विरोध केला. प्रकल्प सीआरझेड क्षेत्रात येत असल्याने पर्यावरण खात्याची परवागी मिळालेली नाही. तसेच खारफुटीची झाडे तोडून कायद्याचे उल्लंघन करून पर्यावरणाचा ऱ्हास केला जात असल्याचा आरोप करून जोरदार विरोध केला. यावेळी न्यायालयाने चांगलेच खडेबोल सुनावले. तसेच, बॉम्बे एन्व्हॉयर्नमेंटल ॲक्शन ग्रुपच्या वकिलांनी एमएमआरसीएलच्या अर्जाला उत्तर देण्यासाठी वेळ मागितल्याने न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जूनपर्यंत तहकूब ठेवली.

**न्यायालय म्हणते**

मुंबईसाठी मेट्रोची गरज आहे. त्याला स्थानिक रहिवाशी व कार्यकर्त्यांनी विरोधासाठी विरोध करण्याची गरज नाही. मुंबईची परिस्थिती विचारात घेतलीच पाहिजे. आज मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक जटील बनला आहे. हा प्रश्न सुटला पाहिजे. आम्हाला ही समस्या सोडवायची आहे, वाढवायची नाही. खरंतर मुंबईत मेट्रो ३० वर्षांपूर्वीच सुरू झाली पाहिजे होती. आता ३० वर्षानंतर ही सेवा सुरू करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**न्यायालयाची परवानगी बंधनकारक**

खारफुटी संदर्भात कोणतीही गोष्ट करताना न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे बॉम्बे एन्व्हॉयर्नमेंटल ॲक्शन ग्रुपने दाखल केलेल्या जनहित याचिकेत म्हटले होते. ही परवानगी मिळावी म्हणून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अर्ज केला आहे.